# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे

सिंचन भवन, बारणे रोड, मंगळवार पेठ, पुणे-४११ ०११
दूरध्वनी क्र. २०-२६१३४९३१/२६१३५२६३ फॅक्स २६१२१५५७

जा.क्र. मकृखोविम/०९/(७३५/२०१६)/प्रशा-२/ २३४७ दिनांक: ९/०६/२०१७

प्रति

| | |
|---|---|
| मा. राज्यमंत्री, जलसंपदा व जलसंधारण व पदसिद्ध उपाध्यक्ष, | मकृखोविम |
| मुख्य सचिव व पदसिद्ध उपाध्यक्ष | मकृखोविम |
| अप्पर मुख्य सचिव (कृषि) व सदस्य | मकृखोविम |
| अप्पर मुख्य सचिव (वित्त) व सदस्य | मकृखोविम |
| अप्पर मुख्य सचिव (म व पू) व सदस्य | मकृखोविम |
| प्रधान सचिव (नियोजन) व सदस्य | मकृखोविम |
| प्रधान सचिव (ज.प्र.व वि) व सदस्य | मकृखोविम |
| सचिव (ज.व्य. व ला.वि) व सदस्य | मकृखोविम |
| सचिव (वने) व सदस्य | मकृखोविम |

**विषय: महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाची ९४वी बैठक दिनांक १७/०३/२०१७ - कार्यवृत्तांत व ठराव**

महोदय,

मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष, मकृखोविम यांच्या अध्यक्षतेखाली दि. १७/०३/२०१७ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ९४ व्या बैठकीचे कार्यवृत्तांत व मान्य झालेले ठराव सोबत आपल्या अवलोकनार्थ व माहितीसाठी सादर करण्यांत येत आहेत. याबाबत आपले अभिप्राय ७ दिवसात कळवावेत ही विनंती.

**सोबत : कार्यवृत्तांत व ठराव.**

**(इं. रा. ब. घोटे)**
**कार्यकारी संचालक व सदस्य सचिव**

प्रत: मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष, मकृखोविम यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२ यांना सहपत्रासह माहितीसाठी सादर.

**सोबत : कार्यवृत्तांत व ठराव**

प्रत: मुख्य अभियंता (जसं)/(विप्र), पुणे यांना सहपत्रासह माहितीसाठी.

**सोबत : कार्यवृत्तांत व ठराव**

प्रत : मा. कार्यकारी संचालक यांचे स्वीय सहाय्यक

**सोबत : कार्यवृत्तांत व ठराव**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९४ वी बैठक दिनांक १७ मार्च २०१७

### ठराव

मा. ना. गिरीष महाजन, मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ९४ वी बैठक शुक्रवार दि. १७ मार्च २०१७ रोजी मा. मंत्री, जलसंपदा यांचे मंत्रालयीन दालन क्र. ३०३, तिसरा मजला, मंत्रालय, मुंबई-३२ येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व निमंत्रित अधिकारी उपस्थित होते.

**सन्माननीय सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना.श्री. विजय शिवतारे | ... | राज्यमंत्री, जलसंपदा व उपाध्यक्ष |
| २. | मा. श्री. सुनिल पोरवाल | | प्रधान सचिव (नियोजन) व सदस्य |
| ३. | मा. श्री. आय. एस. चहल | | प्रधान सचिव (जसंप्र व वि) व सदस्य |
| ४. | मा. श्री. शि. मा. उपासे | | सचिव (ज.व्य. व ला.वि) व सदस्य |
| ५. | मा. श्री. विकास खारगे | | सचिव (वने) व सदस्य |
| ६. | श्री. रा. ब. घोटे | | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**नियामक मंडळाच्या सदस्यांचे प्रतिनिधी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. न. वि. पाटील,अवर सचिव | ... | अप्पर मुख्य सचिव (वित्त) व सदस्य यांचे प्रतिनिधी |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. व्ही. एम. कुलकर्णी | ... | सचिव (प्रकल्प समन्वय) |
| २. | श्री. ता. ना. मुंडे | ... | मुख्य अभियंता (जसं), पुणे |
| ३. | श्री. सं. दे. कुलकर्णी | ... | मुख्य अभियंता (विप्र), पुणे |
| ४. | श्री. विरेंद्र जाधवराव | ... | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मकृखोविम, पुणे |
| ५ | श्री. म. गु. वानखेडे | ... | अधीक्षक अभियंता,मकृखोविम, पुणे |

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

"मान्य"

**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**मा. मंत्री, जलसंपदा**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९४ वी बैठक दिनांक १७ मार्च २०१७

### ठराव

**ठराव क्र. ९४/१**

"ठराव करण्यात येतो की, दि. २०.६.२०१६ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ९२ व्या बैठकीत पारित केलेल्या ठरावावर करण्यात आलेल्या कार्यवाही अहवालाचे नियामक मंडळाने अवलोकन केले आहे."

**ठराव क्र. ९४/२**

"ठराव करण्यात येतो की, दि. २९.०७.२०१६ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ९३ व्या बैठकीत पारित करण्यात आलेले ठराव क्र. ९३/२ व ९३/३ कायम करण्यात येत आहेत."

**ठराव क्र.९४/३**

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचा सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचा ताळेबंद व प्रकल्प प्रगती लेख्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर विषयाची संबंधित उपरोक्त ठराव हा कार्यवृत्तांत मान्यतेची वाट न पहाता याच बैठकीत कायम करण्यात येत आहे"

**ठराव क्र. ९४/४**

"ठराव करण्यांत येतो की, सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठीचा महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचा भांडवली अर्थसंकल्प विद्यमान मंजूर शासन मान्य तरतुदी सुधारित करुन राज्य सार्वजनिक उपक्रम पुनर्विलोकन समितीस सादर करण्याकरिता नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र. ९४/५**

"ठराव करण्यात येतो की, जलसंपदा विभाग शासन निर्णय दि. १७-११-२०१६ नुसार सिंचन व्यवस्थापनाचे सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील (दि. १७-११-२०१६ ते ३१-०३-२०१७) या कालावधीचे भांडवली अंदाजपत्रकास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच या मधून को. प. बंधाऱ्यांचे दरवाजे (बर्गे) निर्मितीसाठी यांत्रिकी संघटनेस व उच्चदाब उपसा सिंचन योजनांच्या वीज बीलास सवलतींचा लाभ घेण्यासाठी मार्च २०१७ साठी प्रथम हप्ता भरण्यासाठी निधीची तरतूद व निधी उपलब्ध करुन देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र. ९४/६**

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या सन २०१५-१६ या वर्षासाठीचा २० व्या वार्षिक अहवालास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर अहवाल राज्य शासनास सादर करणेस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

"मान्य"

| | |
|---|---|
| कार्यकारी संचालक<br>म.कृ.खो.वि.म, पुणे | मा.मंत्री, जलसंपदा<br>व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९४ वी बैठक दिनांक १७ मार्च २०१७

**ठराव क्र. ९४/७**

"ठराव करण्यांत येतो की, महामंडळातंर्गत न्यायालयीन प्रकरणांमध्ये कायदेशीर सल्ला देण्यासाठी कायदे सल्लागाराची तातडीची गरज लक्षात घेता अनुभवी निवृत्त मुख्य जिल्हा न्यायाधीश ॲड श्री.सुमंन्त मारोतीराव कोल्हे यांची पूर्णवेळ महामंडळाचे कायदे सल्लागार म्हणून महामंडळाचे आदेश क्र. ७६५ दि.१७/०९/२०१६ अन्वये नियुक्ती करण्यात आली आहे या नियुक्तीच्या कार्यवाहीस नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र. ९४/८**

"ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या अंतर्गत असलेल्या मंडळ कार्यालयीनस्तरावर न्यायालयीन प्रकरणे हाताळणे करीता मंडळ / प्राधिकरणांतर्गत प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे व यापुढे निर्माण होणाऱ्या न्यायालयीन प्रकरणांचा विहीत कालमर्यादेत निपटारा होण्याच्या दृष्टीने मंडळ / प्राधिकरण स्तरावर "परिशिष्ट-अ" प्रमाणे कायदा कक्ष स्थापन करुन सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश यांची एक वर्षाच्या कालावधीकरिता कायदे सल्लागार / विधी अधिकारी म्हणून कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र. ९४/९**

"ठराव करण्यांत येतो की, महामंडळांतर्गत कामांच्या संदर्भात महामंडळाच्या पॅनेलवरील वकिलांचे लवाद प्रकरणाच्या विधी शुल्काबाबत आणि खर्चाच्या केलेल्या फेररचनेस "परिशिष्ट-१" प्रमाणे नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र. ९४/१०**

"ठराव करण्यांत येतो की, महामंडळांतर्गत जिल्हा सत्र न्यायालयातील भूसंपादन कलम १८ व २८ अंतर्गतची निवडक व गुंतागुंतीची प्रकरणे मा. उच्च न्यायालयात चालविण्यासाठी वरिष्ठ विधिज्ञांची नेमणूक करणे व त्यांचे विधीशुल्क निश्चित करण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना प्रदान करण्याबाबतच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र. ९४/११**

"ठराव करण्यात येतो की, सन २०१६-१७ मध्ये उपसा सिंचन योजना चालविण्यासाठी थकीत व संभाव्य वीज बील रक्कम रु.४९.४१ कोटीचा निधी महामंडळास तातडीने मिळणबाबत शासनास दि. ०९/०८/२०१६ चे पत्रान्वये विनंती करण्यात आली होती. तथापि आश्वासन पुर्तता करण्यासाठी शासनाकडून सदर निधी प्राप्त होईपर्यंत उपसा सिंचन योजनांचे संभाव्य वीज बील अदा करण्यासाठी महामंडळातील भांडवली जमा (उपलब्ध स्वनिधी) यामधून रु. २००४.५८ लक्ष

"मान्य"

| | |
|---|---|
| कार्यकारी संचालक<br>म.कृ.खो.वि.म, पुणे | मा.मंत्री, जलसंपदा<br>व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९४ वी बैठक दिनांक १७ मार्च २०१७

खर्च करण्यास मा. मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष (मकृखोविम) यांनी मान्यता दिली आहे. सदर बाबीस नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र. ९४/१२**

**"ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील सिंचन व्यवस्थापनाचे काम महामंडळामार्फत करणे व पाणीपट्टीची रक्कम प्रकल्पांच्या सिंचन व्यवस्थापनाच्या कामासाठी खर्च करण्याबाबतच्या "जोडपत्र-अ" नुसारच्या नियामावलीस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

**ठराव क्र. ९४/१३**

**"ठराव करण्यात येतो की, शासन निर्णय क्र. देवदु २०१५/(८३६/२०१५)/सिव्यं (कामे) दि. १७/११/२०१६ नुसार महामंडळस्तरावर उपलब्ध होणाऱ्या पाणीपट्टीच्या रकमेतून हाती घ्यावयाची विस्तार व सुधारणा / विशेष दुरुस्तीच्या रु. ५ कोटी किमंतीपर्यंतच्या कामांना शासन स्तरावरुन प्रशासकीय मान्यता देण्याचे नियामक मंडळात ठरले."**

**ठराव क्र. ९४/१४**

**"ठराव करण्यात येतो की, शासन जलसंपदा विभाग निर्णय क्र.संकीर्ण २०१५/(४४/१५) सिंव्य(धोरण) दिनांक १७/११/२०१६ नुसार पुर्ण झालेल्या, प्रगतीपथावरील व नियोजित सिंचन प्रकल्पातून (अ) पिण्यासाठी १५ टक्के (ब) औद्योगिक वापरासाठी १० टक्के या मर्यादेमधील बिगर सिंचन पाणी आरक्षण प्रस्तावास मान्यता देण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांचे शिफारशीनूसार मा.मंत्री, जलसंपदा तथा अध्यक्ष, मकृखोविम,पुणे यांना प्रदान करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.**

**ठराव क्र. ९४/१५**

**"ठराव करण्यात येतो की, कोल्हापूर महानगरपालिकेस कोल्हापूर शहरासाठी दुधगंगा धरणातून पाणीपुरवठा करणेसाठी पाणीपुरवठा पाइपलाईनचे सुधारित संरेखनानुसार दूधगंगा प्रकल्पाच्या डावा कालव्याच्या निरीक्षण पथाच्या बाजूने ७२१ मी.लांबीमध्ये जमिनीच्या वरून व ११,१९९ मी. लांबीमध्ये जमिनीखालून पाणीपुरवठा पाईपलाईन टाकण्यासाठी सरासरी २मी.रूंदीने अंदाजे २.३८४ हे. जमिन जमिनीचे मालकी हक्क हस्तांतरण न-करता नाममात्र वार्षिक भाडे एक रुपया व रुपये दोन कोटी सुरक्षा अनामत रक्कम (Refundable) याप्रमाणे महापालिकेस देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९४ वी बैठक दिनांक १७ मार्च २०१७

ठराव क्र. ९४/१६

"ठराव करण्यांत येतो की, पाटबंधारे प्रकल्प / कालवे यांची सुरक्षिततेच्या दृष्टीने कालव्याचे सिंचन व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्ती व्यवस्थित करता येणे शक्य व्हावे या दृष्टीने कुकडी प्रकल्पावरील डाव्या कालव्याच्या कि. मी. ७४ व ७५ मध्ये १ मे. वॅ. सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी लागणारी ४.०० हे. जमीन ग्रामपंचायत राळेगणसिध्दी, ता. पारनेर, जि. अहमदनगर यांना महामंडळाचे पत्र क्र. मकृखोविम/३७/(१५६/२०१५)/प्रशा-२/४३६२, दि. ०९-११-२०१६ अन्वये नमूद अटीं व शर्तीं च्या अधीन राहून भाडे कराराने देण्यास नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ९४/१७

"ठराव करण्यात येतो की, सर सेनापती वीर बाजी पासलकर यांचे स्मारक पुणे महानगरपालिकेच्यावतीने पुणे येथे उभारण्यांत येत असलेल्या स्मारकालगतची जलसंपदा विभागाची आरक्षित असलेली जागा शासन जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. जमीन.२०१५/(प्र.क्र.२६५/२०१५)/सिं.व्य.(म.), दि. २५-१०-२०१६ व शासन जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. जमीन.२०१५ /(प्र.क्र.२६५/२०१५)/ सिं.व्य.(म),दि.११-०१-२०१७ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार महामंडळ कायद्यातील कलम २८ नुसार महामंडळाच्या ताब्यातील स. नं. ११६, नारायण कोठी, सिंहगड रोड, पुणे येथील ०.५८.६८ हे. जागा सद्य:स्थितीत जशी आहे तशा स्थितीत तसेच भविष्यातील नियोजित आरक्षणाचे अधिन चालू वर्षाच्या रेडी रेकनर नुसार होणारी किंमत महामंडळास मिळण्याच्या व पुणे महानगरपालिकेच्या वतीने पुणे येथे उभारण्यात येत असलेल्या सरसेनापती वीर बाजी पासलकर यांचे स्मारकाचे प्रयोजनासाठीच उपयोग करण्याच्या अटीवर जिल्हाधिकारी, पुणे यांचेमार्फत पुणे महानगरपालिकेस कायमस्वरुपी हस्तांतरीत करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ९४/१८

"ठराव करण्यांत येतो की, निवकणे ल.पा. योजनेचे ६६.८० मी. इतक्या उंचीसाठी पूर्वी केलेले धरणाचे काम तसेच ठेवून मुळ प्रकल्प अहवालानुसार ५०.८० मी.उंचीपर्यंत काम करणे, धरणाची सद्या सुरु असलेली निविदा आहे त्या स्थितीत अंतिम करणे, धरणाचे उर्वरीत मातीकाम यांत्रिकी विभागाकडुन पूर्ण करणे, धरणाचा सांडवा, विमोचकाचे बांधकामासाठी (कठीण मुरुमाच्या खोदाईसहीत) नव्याने निविदा प्रक्रीया राबवून प्रकल्पाचे काम पुर्ण करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ९४ वी बैठक दिनांक १७ मार्च २०१७

ठराव क्र. ९४/१९

एकरुख उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्याच्यादृष्टीने कारंबा पंपगृहाचे कामे पूर्ण करण्याची बाब तपासून आवश्यक दुरुस्तीसह सुधारित प्रस्ताव नियामक मंडळाचे पुढील बैठकीत ठेवावा असे चर्चेत ठरल्याने सदर विषयी ठराव पारित करण्यात आला नाही.

**ठराव क्र. ९४/२०**

**"ठराव करण्यांत येतो की, उरमोडी प्रकल्पांतर्गत उरमोडी उपसा सिंचन योजना टप्पा क्र.१ वाठार किरोली येथे ४ राखीव पंप व अनुषंगिक बाबींची तरतुद ठेवणेस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

**ठराव क्र. ९४/२१**

**"ठराव करण्यांत येतो की, सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा यांच्या आखत्यारितील तारळी पाटबंधारे प्रकल्प ता. पाटण, जि. सातारा या प्रकल्पांतर्गत पाटण तालुक्यातील तारळी धरणांतर्गत मौजे, तोंडोशी गावातील ४९ ग्रामस्थांची ४९ घरे विहित २०० मी. त्रिज्येच्या बाहेर असलेने धरण कामाच्या स्विकृत निविदेच्या करारनाम्यात नियंत्रीत सुरुंग पद्धतीने खोदाई करणेची तरतूद अंतर्भूत नसल्यामुळे व शासन, महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. आरपीए/३५१५/४१०/५३११५/र-४ दि. ४/३/२०१५ मधील सुचनानुसार सदर घरांच्या रू.८५.३३ लक्ष रकमेच्या नुकसान भरपाईचा खास बाब प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

**ठराव क्र. ९४/२२**

**"ठराव करण्यांत येतो की, टेमघर धरणाची गळती प्रतिबंधक कामे प्रगतीपथावर असताना त्याचे गुणनियंत्रणाचे काम खात्याच्या नियमित गुणनियंत्रण यंत्रणेच्या कामाच्या व्यतिरिक्त स्वतंत्र अभिकरणाव्दारे म्हणजेच त्रयस्थ पक्षा मार्फत (Third Party Inspection) तज्ञ समितीच्या अहवालातील तरतुदीनुसार करुन घेण्याचा प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

**ठराव क्र. ९४/२३**

**"ठराव करण्यात येतो की, टेमघर धरणाची गळती प्रतिबंधक कामे चालू असताना भेटी देऊन तांत्रिक मार्गदर्शन करणे, कामाच्या प्रगतीचा आढावा घेणे व केलेल्या उपाय योजनांच्या परिणामकारकतेचे मूल्यमापन करणे, तांत्रिक सल्लागारांचे अहवालावर व गुणनियंत्रण विभागाचे अहवालावर चर्चा करणे, कामाची गुणवत्ता सुधारण्याचे दृष्टीने आवश्यक उपाययोजना सुचविणे या करिता Panel of Experts (PoE) नेमण्यास मान्यता देण्यात येत असून या समितीच्या**

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
नियामक मंडळाची ९४ वी बैठक दिनांक १७ मार्च २०१७

रचनेमध्ये अध्यक्ष म्हणून निवृत्त सचिव / निवृत्त मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग तसेच गुणनियंत्रण, मिश्र संकल्पन, ग्राऊटींगचे काम व गळती प्रतिबंधक उपाय योजनाकरीताचे रासायनिक साहित्य या विषयातील तज्ञ व्यक्तींची समिती गठीत करण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यास नियामक मंडळ मान्यता देत आहे."

**ठराव क्र. ९४/२४**

शासन जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.जमीन २०१५/(प्र.क्र.२६५/२०१५)/सिं.व्य (म) दि.११/१/२०१७ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार जलसंपदा विभागाकडील/महामंडळाच्या ताब्यातील मोजे मारुंजी,ता.मुळशी,जि.पुणे येथील गट क्रं. ६५ मधील संपादित क्षेत्रातील मोकळी जागा १०३६१८ चौ.फुट व इमारती १३३५०.६८चौ.फुट भविष्यात लागणार नसल्याने महामंडळाच्या दरपत्रकातील शैक्षणिक संस्थेसाठी लागू असलेल्या प्रचलित दराने ११ महिने कालावधीसाठी नवक्षितीज मतिमंद मुलांची निवासी कार्यशाळा व शाळा यासाठीच्या भाडेपट्टयाचे नुतनीकरण व मागील थकित भाडेपट्टा वसुल करणे बाबतच्या प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

**अटी :**

(१) सदर भाडेपट्टयास दरवर्षी आवश्यक असल्यास मुदतवाढ घेणे संस्थेस बंधनकारक राहील

(२) संस्थेने त्याचेकडे असलेला थकीत भाडेपट्टा भरणा करुन जलसंपदा विभागा समवेत करारनामा करणे बंधनकारक राहील.

(३) ज्या कारणासाठी जागा देणे प्रस्तावित आहे त्याच प्रयोजनासाठी जागेचा वापर होणे आवश्यक आहे. अन्यत: सदर जागेचा ताबा परत घेण्यात येईल.

**ठराव क्र. ९४/२५**

ठराव करण्यात येतो की, "प्रकल्पांचे मंजुर सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावात अंतर्भूत असलेल्या घटकांच्या किंमतीचे मर्यादित यापूर्वी निर्माण झालेले मंजुर निविदेवरील वाढीव दायित्व व चालु निविदेवरील वाढीव दायित्व मंजुरीचे अधिकार हे निविदा कामाच्या व्याप्तीच्या मर्यादेत (Within the Scope of Work) ५ टक्के पर्यंत दायित्व प्रस्तावांना मान्यता देण्याचे अधिकार महामंडळाच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या सहमतीने महामंडळाच्या कार्यकारी संचालकांना राहतील. मात्र तत्पूर्वी करारावरील एकूण वाढीव खर्च ५% चे मर्यादेत राहील याबाबतचे प्रमाणपत्र मुख्य अभियंता यांनी देणे गरजेचे असेल व याबाबत मुख्य अभियंता हे जबाबदार असतील. तसेच कलम ३७/३८ किंवा अतिरिक्त बाबीमुळे होणारी कराराची किंमतवाढ (भाववाढ वगळून) ५% पेक्षा अधिक १५ % पर्यंत च्या प्रस्तावाना मान्यता देण्याचे अधिकार कार्यकारी समितीच्या शिफारशीनुसार महामंडळाचे अध्यक्ष यांना व १५% पेक्षा अधिक होत असल्यास अशा प्रस्तावांना मान्यता देण्याचे अधिकार कार्यकारी समितीच्या शिफारशीने

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९४ वी बैठक दिनांक १७ मार्च २०१७

महामंडळाच्या नियामक मंडळास, देण्याच्या प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र. ९४/२६**

"ठराव करण्यात येतो की, उस्मानाबाद पाटबंधारे मंडळाकडील साठवण तलाव गुगळगाव, ता. उमरगा जि. उस्मानाबाद , साठवण तलाव बेडगा ता. उमरगा जि. उस्मानाबाद, साठवण तलाव वागदरी ता. तूळजापूर जि. उस्मानाबाद व साठवण तलाव कन्हेवाडी ता. आष्टी जि. बीड हे ४ ल.पा. प्रकल्पाचे काम करण्यास प्रकल्पग्रस्तांचा तीव्र विरोध, तसेच या प्रकलपाच्या कार्यक्षेत्रातील संबंधीत बाधित शेतकरी, ग्रामपंचायत कार्यालय, जिल्हा परिषद सदस्य व अध्यक्ष, पंचायत समिती सदस्य व मा. विसस, यांनी प्रकल्प रद्द होण्याबाबतची मागणी विचारात घेता उस्मानाबाद जिल्हयातील सदर ४ प्रकल्प व भीमा कालवे मंडळ,सोलापूर यांचेकडील साठवण तलाव पौट ता.मंगळवेढा, जि.सोलापूर व साठवण तलाव हत्तीद ता.सांगोला, जि.सोलापूर या प्रकल्पाचे काम सुरू होण्यासाठी प्रयत्न करूनही शेतकऱ्यांचा भूसंपादनासाठी असलेला विरोध व सदर प्रकल्पांची किंमत प्रचलित मापदंडात बसत नसल्याने तसेच को.प.बंधारा तारापूर(सुस्ते) ता.पंढरपूर जि.सोलापूर या प्रकल्पाचे सिंचनक्षेत्र प्रशासकीय मान्यतेच्या तुलनेत २० %पेक्षा अधिक कमी होत असून सदर प्रकल्प तांत्रिकदृष्टया व आर्थिकदृष्टया प्रचलित मापदंडात बसत नसल्याने सोलापूर जिल्हयातील सदर ३ प्रकल्प असे एकूण ७ प्रकल्प रद्द करण्यास नियामक मंडळाची शिफारस असून त्यानुसार प्रस्ताव शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्र. ९४/२७**

"ठराव करण्यात येतो की, शासन / महामंडळाची पानशेत (कुरणखुर्द) येथील स नं ६७ मधील २० गुंठे जागेचे चालू शासकीय मूल्य शासन / महामंडळास मिळण्याच्या तसेच शासन / महामंडळाच्या खालील अटी व शर्तीचे पालन करण्याच्या अटीवर सदर जागा महावितरणच्या स्वीचिंग उपकेंद्रासाठी जिल्हाधिकारी पुणे यांचे मार्फत महावितरण कार्यालयास कायम स्वरूपी हस्तांतरित करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**अटी व शर्ती :**

(१) सदर जागेमध्ये महावितरण कार्यालयास कोणत्याही प्रकारचे बांधकाम करावयाचे झाल्यास, त्यास शासन /महामंडळाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

(२) सदर जागेचा वापर स्वीचिंग उपकेंद्र प्रयोजना शिवाय अन्य प्रयोजनार्थ करता येणार नाही.

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९४ वी बैठक दिनांक १७ मार्च २०१७

ठराव क्र. ९४/२८

**"ठराव करण्यात येतो की, लोकप्रतिनिधींची आग्रही मागणी विचारात घेता इचलकरंजी नगरपरिषद नळ पाणी पुरवठा योजना ता.हातकणंगले जि.कोल्हापूर यांची पिण्यासाठी २४.२६५६ द.ल.घ.मी. व औद्योगिक वापरासाठी ५.९६२० द.ल.घ.मी. ची मागणी पिण्यासाठी १५% व औद्योगिक वापरासाठी १०% या विहीत मर्यादेच्या आत असल्याने इचलकरंजी नगरपरिषदेने थकीत पाणीपट्टीबाबत शासन पत्र क्र. बिसिंआ २०१६/(५३३/१६)/सिंव्य (धोरण) दि. ३१/०१/२०१७ मधील नमूद बाबींची पूर्तता करणेच्या व सदर प्रस्तावास कार्यकारी समिती/नियामक मंडळ यांची कार्योत्तर मान्यता घेण्याच्या अटीअधीन मा.मंत्री (जलसंपदा) व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. यांनी मान्यता दिलेली आहे. यास नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे."**

तद्नंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

**"मान्य"**

**(इंजि. रा. ब.घोटे)**
**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**(गिरीष महाजन)**
**मा.मंत्री, जलसंपदा**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९४ वी बैठक दिनांक १७ मार्च २०१७

ठराव क्र.९४/८ चे परिशिष्ट-अ

**मंडळ/प्राधिकरण स्तरावरील कायदा कक्षाची रचना**

| अ. क्र | मंडळ / प्राधिकरणाचे नांव | जिल्हा | समन्वय अधीक्षक अभियंता | कायदा सल्लागार / विधी अधिकारी | कायदा कक्षातील अधिकारी / कर्मचारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | अ.अ. भीमा कालवा मंडळ, सोलापूर | सोलापूर | अ.अ. भीमा कालवा मंडळ, सोलापूर | सोलापूर जिल्ह्यासाठी एक | १) मंडळाचे सहा.अधीक्षकअभियंता.<br>२) संबंधित लिपीक.<br>३) कायदे सल्लागार /विधी अधिकारी |
| २ | अ.अ. व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर | सोलापूर | अ.अ.व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर | | १) मंडळाचे सहा.अधीक्षक अभियंता.<br>२) संबंधित लिपीक.<br>३) कायदे सल्लागार / विधी अधिकारी |
| ३ | अ.अ.उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद. | उस्मानाबद | अ.अ.उस्मानाबाद पाटबंधारे मंडळ, उस्मानाबाद. | उस्मानाबाद जिल्ह्यासाठी एक | १)मंडळाचे सहा.अधीक्षक अभियंता.<br>२) संबंधित लिपीक.<br>३) कायदे सल्लागार / विधी अधिकारी |
| ४ | अ.अ. सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा | सातारा | अ.अ. सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा | | १)मंडळाचे सहा.अधीक्षक अभियंता.<br>२) संबंधित लिपीक.<br>३) कायदे सल्लागार / विधी अधिकारी |

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९४ वी बैठक दिनांक १७ मार्च २०१७

| अ. क्र | मंडळ / प्राधिकरणाचे नांव | जिल्हा | समन्वय अधीक्षक अभियंता | कायदा सल्लागार / विधी अधिकारी | कायदा कक्षातील अधिकारी / कर्मचारी |
|---|---|---|---|---|---|
| ५ | अ.अ. सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली. | सांगली | अ.अ. सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली. | सातारा, सांगली व कोल्हापूर या तीनही जिल्ह्यांसाठी एक. | १)मंडळाचे सहा.अधीक्षक अभियंता. २) संबंधित लिपीक. ३) कायदे सल्लागार / विधी अधिकारी |
| ६ | अ.अ.कोल्हापूर पाटबंधारे मंडळ, कोल्हापूर. | कोल्हापूर | अ.अ.कोल्हापूर पाटबंधारे मंडळ, कोल्हापूर. | | १)मंडळाचे सहा.अधी.अभि. २) संबंधित लिपीक. ३) कायदे सल्लागार / विधी अधिकारी |
| ७ | अ.अ.पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे. | पुणे | अ.अ.पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे. | पुणे जिल्ह्यासाठी एक | १)मंडळाचे सहा. अधी. अभि. २) संबंधित लिपीक. ३) कायदे सल्लागार / विधी अधिकारी |
| ८ | अ.अ.पुणे पाटबंधारे प्रकल्प मंडळ,पुणे | पुणे | अ.अ.पुणे पाटबंधारे प्रकल्प मंडळ,पुणे | | १)मंडळाचे सहा. अधी. अभि. २) संबंधित लिपीक. ३) कायदे सल्लागार / विधी अधिकारी |
| ९ | अ.अ.कुकडी सिंचन मंडळ, पुणे | पुणे | अ.अ.कुकडी सिंचन मंडळ, पुणे | | १)मंडळाचे सहा.अधीक्षक अभियंता. २) संबंधित लिपीक. ३) कायदे सल्लागार / विधी अधिकारी |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९४ वी बैठक दिनांक १७ मार्च २०१७

ठराव क्र.९४/९ चे परिशिष्ट-१

**लवाद प्रकरणीचे विधी शुल्क**

| अ.क्र. | लवाद प्रकरणी कार्यवाही | विधिज्ञ | अनुज्ञेय विधी शुल्क (रूपये) प्रतिदिनी |
|---|---|---|---|
| १ | लवादा समोर युक्तीवाद करण्याकरिता किंवा अन्य स्वरुपात वेळोवेळी उपस्थित राहणे | अ गटातील | १५,०००/- |
| | | ब गटातील | ७,५००/- |
| २ | लवाद प्रकरणी हजर राहण्यासाठी प्रत्येक तारखेस प्रवास खर्च , राहण्याचा खर्च व इतर अनुषंगिक खर्चासाठी (लवाद प्रकरणांचे काम महामंडळाचे संबंधीत वकिल ज्या ठिकाणी रहात असतील त्या ठिकाणी किंवा त्या शहरात झाले असेल तर सदरचा खर्च त्या वकिलांना देण्यात येणार नाही) | अ गटातील | १०,०००/- |
| | | ब गटातील | ७,५००/- |
| ३ | संबंधीतांशी विचार विनिमय करणे (सर्व खर्चासहीत) | अ गटातील | १५,०००/- |
| | | ब गटातील | ७,५००/- |
| ४ | लवादाचे कामकाज न झाल्यास | अ गटातील | ५,०००/- |
| | | ब गटातील | २,५००/- |
| ५ | लवाद प्रकरणात लवादाने केलेल्या आदेशाविरुध्द/ निर्णयाविरुध्द रिट याचिका/अपील दाखल करणे | अ गटातील | २०,०००/- |
| | | ब गटातील | १५,०००/- |
| ६ | लवाद प्रकरणात लवादाने केलेल्या आदेशाविरुध्द/ निर्णयाविरुध्द रिट याचिका/अपील दाखल करण्यासाठी होणाऱ्या सर्व खर्चासाठी | अ व ब गटातील | ७,५००/- |
| ७ | जिल्हा न्यायालयात लवाद कायदयाच्या कलम ३४ नुसार दाखल झालेल्या अर्जाच्या प्रकरणासाठी | अ गटातील | २०,०००/- |
| | | ब गटातील | १५,०००/- |
| ८ | जिल्हा न्यायालयात कलम ३४ नुसार दाखल झालेल्या अर्ज प्रकरणात जिल्हा न्यायालयाने केलेल्या आदेशाविरुध्द/ निर्णयाविरुध्द रिट याचिका/अपील दाखल करणे | अ गटातील | २०,०००/- |
| | | ब गटातील | १५,०००/- |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९४ वी बैठक दिनांक १७ मार्च २०१७

| अ.क्र. | लवाद प्रकरणी कार्यवाही | विधिज्ञ | अनुज्ञेय विधी शुल्क (रूपये) **प्रतिदिनी** |
|---|---|---|---|
| ९ | जिल्हा न्यायालयाने कलम ३४ नुसार दाखल झालेल्या अर्ज प्रकरणात केलेल्या आदेशाविरुध्द/निर्णयाविरुध्द रिट याचिका/अपील दाखल करण्यासाठी होणाऱ्या सर्व खर्चासाठी | अ व ब गटातील | ७,५००/- |
| १० | दिवाणी न्यायालयात निविदाच्या अनुषंगाने दाखल झालेल्या दिवाणी दावा प्रकरणासाठी | अ गटातील | २०,०००/- |
| | | ब गटातील | १५,०००/- |
| ११ | जिल्हा न्यायालयात दाखल झालेल्या लवाद प्रकरणा संबंधीच्या अर्ज प्रकरणात तसेच दिवाणी न्यायालयात निविदासंबंधी दाखल झालेल्या दावा प्रकरणासाठी **प्रत्येक तारखेस प्रवास खर्च व त्या अनुषंगाने होणाऱ्या इतर खर्चासाठी (अशी कामे महामंडळाचे** संबंधीत वकिल ज्या ठिकाणी रहात असतील त्या **शहरात पार पडली असतील तर सदरचा खर्च त्यांना** देण्यात येणार नाही. तसेच उस्मानाबाद, सोलापूर **आणि बीड येथे अशा प्रकरणासाठी पुणे येथून** महामंडळाच्या पॅनेलवरील वकिलांना जावे लागल्यास **त्यांनी अशा खर्चाचा स्वतंत्र प्रस्ताव दयावा.** त्याचा गुणदोषावर विचार करुन स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येईल) | अ व ब गटातील | ७,५००/- |
| १२ | दिवाणी न्यायालयात निविदाच्या अनुषंगाने दाखल झालेल्या दिवाणी दाव्यात दिवाणी न्यायालयाने केलेल्या आदेशाविरुध्द/ निर्णयाविरुध्द रिट याचिका/अपील दाखल करण्यासाठी | अ गटातील | २०,०००/- |
| | | ब गटातील | १५,०००/- |
| १३ | दिवाणी न्यायालयात निविदाच्या अनुषंगाने दाखल झालेल्या दिवाणी दाव्यात दिवाणी न्यायालयाने केलेल्या आदेशाविरुध्द/निर्णयाविरुध्द रिट याचिका/अपील दाखल करण्याकरीता येणाऱ्या सर्व खर्चासाठी | अ व ब गटातील | ७,५००/- |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ९४ वी बैठक दिनांक १७ मार्च २०१७

| अ.क्र. | लवाद प्रकरणी कार्यवाही | विधिज्ञ | अनुज्ञेय विधी शुल्क (रूपये) **प्रतिदिनी** |
|---|---|---|---|
| १४ | निविदासंबंधी नोटिस देण्यासाठी अथवा आलेल्या नोटिसला उत्तर देण्यासाठी सर्व खर्चासहित. | अ व ब गटातील | ७,५००/- |

**टिप:**

१) ***अ गटातील वकिल :-*** *ज्या वकिलांचा व्यवसाय १५ वर्षापेक्षा जास्त झाला आहे असे कार्यरत वकिल.*

२) ***ब गटातील वकिल :-*** *ज्या वकिलांचा व्यवसाय ७ वर्षापेक्षा जास्त परंतु १५ वर्षापेक्षा कमी झाला आहे असे कार्यरत वकिल.*

३) *वरीलप्रमाणे प्रस्तावीत केलेले विधीशुल्क आणि प्रस्तावीत केलेल्या खर्चाच्या रक्कमांची फ़ेररचना सध्या प्रलंबित असलेल्या तसेच येथून पुढे दाखल होणाऱ्या प्रकरणांच्या कामी लागू होईल.*

४) *ज्या प्रकरणांमध्ये महामंडळाचे वकील स्वत:च्या कारणास्तव कामकाज न करताच पुढील तारीख मागतील त्या तारखेचे विधिशुल्क त्यांना मागता येणार नाही/ देण्यात येणार नाही.*

५) *निश्चित केलेले विधिशुल्क / खर्च यापैकी ५० टक्के रक्कम संबंधित प्रकरणाच्या सुरवातीस महामंडळाच्या संबंधित वकिलांना देता येईल. राहिलेले सर्व विधिशुल्क / खर्च महामंडळाच्या संबंधित वकिलांना त्या त्या प्रकरणांचा निकाल लागल्यानंतर व त्यांनी निवाड्याची/ न्यायनिर्णायाची प्रत स्वत:च्या अभिप्रायासह महामंडळाच्या संबंधित विभागास तसेच महामंडळास सादर केल्यानंतर देण्यात येईल.*

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९४ वी बैठक दिनांक १७ मार्च २०१७

# ठराव क्र. ९४/१२ चे जोडपत्र-अ

## महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील सिंचन व्यवस्थापनाचे काम महामंडळामार्फत करणे व पाणीपटटीची रक्कम प्रकल्पांच्या सिंचन व्यवस्थापनाच्या कामासाठी खर्च करण्याबाबतची नियमावली

**१.०० सिंचन व्यवस्थापनाचे काम महामंडळा मार्फत करणे बाबत अवलंबावयाची कार्यपध्दती :**

**१.१** सिंचन पाणीपट्टी ज्या प्रकल्पावरुन वसूल होईल त्याच प्रकल्पावर खर्च करण्यात यावी. शासनाने अधीक्षक अभियंता यांना शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१६ / (८८/१६) सिं.व्य. (कामे) दि.०९-०५-२०१६ अन्वये प्रापणसूची मंजूर करण्याचे अधिकार दिलेले आहेत. त्यानुसार सिंचन पाणीपट्टीच्या मर्यादेत प्रापणसूची मंजूर करण्याचे अधिकार अधीक्षक अभियंता यांना आहेत.

सिंचनाच्या पाणीपट्टीच्या रकमा निश्चित करण्यासाठी मागील ३ वर्षातील वसूल रकमेची सरासरी काढण्यात यावी व त्याच्या मर्यादेत नियमित देखभाल दुरुस्ती व परिरक्षणाच्या प्रापण सूचीस अधीक्षक अभियंता यांनी मंजूरी द्यावी. मंजुरीच्या वर्षात होणारा खर्च जमा होणाऱ्या पाणीपट्टीच्या मर्यादेत राहील याची अधीक्षक अभियंता यांनी स्वत: दक्षता घ्यावी. प्रापणसूची मंजूर करतांना खालील प्रमाणे प्रकल्प घटकनिहाय करावी.

| | | |
|---|---|---|
| १. | मोठे प्रकल्प | प्रकल्पनिहाय |
| २. | मध्यम प्रकल्प | प्रकल्पनिहाय |
| ३. | लघु प्रकल्प | मंडळांतर्गत सर्व लघु प्रकल्प एकत्रीत |

लघु प्रकल्पावरील अत्यावश्यक व अनिवार्य कामे उदा.को.प.बंधाऱ्यांचे गेट टाकणे / काढणे, शिर्ष विमोचकाची द्वार दुरुस्ती, यांत्रिकी विभागामार्फत करावयाची नियमित देखभाल दुरुस्ती कामे इ. साठी पाणीपट्टीची पुरेशी रक्कम जमा होत नसल्यास वा निधी अपुरा असल्यास असा अत्यावश्यक खर्च भागविण्यासाठी महामंडळाच्या बिगर सिंचनाच्या ४० % हिश्यातून निधी पाणीपट्टी खर्च खात्यात वर्ग करण्यात यावा. याबाबत सविस्तर कारणमिमांसेसह मुख्य अभियंता यांचे शिफारशीसह आवश्यक निधीचा प्रस्ताव महामंडळास सादर केल्यानंतर या बाबत योग्य तो निर्णय घेण्यांत येईल.

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९४ वी बैठक दिनांक १७ मार्च २०१७

१.२ सिंचन प्रकल्पांची देखभाल दुरुस्तीची कामे करण्याबाबत खालील तीन शासन निर्णय आहेत.

| अ.क्र. | विषय | शासन निर्णय क्रमांक व दिनांक |
|---|---|---|
| १ | पाटबंधारे प्रकल्पांच्या देखभाल आणि दुरुस्तीच्या प्रमाणकाचे पुनर्रक्षण | शासन परिपत्रक क्र.देदुप्र २००१/ (२७४/२००१) / सिं.व्य. (कामे) दि.०२/०७/२००२. |
| २ | पाटबंधारे प्रकल्पांच्या देखभाल आणि दुरुस्तीचे मापदंड सुधारित करणे | शासन निर्णय क्र. संकीर्ण-२००७/ (१३/०७) / सिंव्य (कामे) दि.२७/०८/२०१३ |
| ३ | सिंचन प्रकल्पांची देखभाल दुरुस्तीची कामे करण्याबाबत मार्गदर्शक सूचना | शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१६/ (८८/१६)/ सिं.व्य. (कामे) दि.०९/०५/२०१६ |

उपरोक्त शासन निर्णयाची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करण्यातील अडचणी तसेच तदनुषंगाने प्रापणसूची मंजूर करताना उदभवणाऱ्या अडचणी विचारात घेऊन प्रकल्पाच्या अंमलबजावणी टप्प्यातील आवश्यकतेनुसार कामांचे कार्यान्वयन होण्याची गरज निर्माण झालेली आहे. तसेच सिंचनाच्या **पाणीपट्टीच्या मर्यादेत प्रकल्पनिहाय नियमित देखभाल दुरुस्ती कामे करण्याच्या मर्यादा शासनाने** दि.१७/११/२०१६ च्या निर्णयाद्वारे घालून दिल्या आहेत. त्यामुळे मापदंडाची मर्यादा, उपांगनिहाय खर्चाच्या मर्यादा, शाखानिहाय/ उपविभाग घटक समजून निविदा करणे ही बंधने संयुक्तीक होत नाही. प्रकल्पाच्या गरजेनुसार व आपत्कालीन परिस्थितीत करावयाच्या कामांची पूर्ण मुभा नियंत्रक अधिकाऱ्यास असणे जरुरीचे आहे.

तथापि शासन परिपत्रक क्र. संकीर्ण.२०१६/ (५९१/१६) / सिं.व्य. (धोरण) दि. २२-११-२०१६ मधील परिच्छेद १८ नुसार महामंडळांनी सिंचन व्यवस्थापनाचे काम शासनाच्या प्रचलित नियमानुसार करावे अशा सुचना आहेत. त्यामुळे वरील तीन ही शासन निर्णयामध्ये सुधारणा होणे बाबत शासनास स्वतंत्र प्रस्ताव पाठवून विनंती करावी

१.३ सिंचन व्यवस्थापनाच्या जमा होणा-या भांडवली रकमा व खर्चाचे वार्षिक कार्यक्रम अंदाजपत्रक महामंडळाचे नियामक मंडळात मान्य झाल्यानंतर सिंचन पाणीपट्टीच्या प्रकल्पनिहाय जमा रकमेतून आर्थिक वर्षात दर तीन महिन्यांनी १५-२५-३०-३० % या प्रमाणात निधी अधीक्षक अभियंता यांना महामंडळाकडून सिंचन व्यवस्थापनाचे वार्षिक अंदाजपत्रकाच्या मर्यादेत पतपत्र (LOC) वितरित करण्यात यावे.

१.४ बिगर सिंचन पाणीपट्टीच्या रकमेतून करावयाच्या कामांना महामंडळाचे नियामक मंडळाची मान्यता प्राप्त झाल्यावर बाब / काम निहाय पतपत्र (LOC) अधीक्षक अभियंता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९४ वी बैठक दिनांक १७ मार्च २०१७

१.५ मागील तीमाहीमध्ये वितरीत करण्यांत आलेल्या निधीचे उपयोगीता प्रमाणपत्र (Utilization Certificate) अधीक्षक अभियंता यांचेकडून प्राप्त झाल्यावरच पुढील तिमाहीचा निधी अधीक्षक अभियंता यांना संवितरीत करण्यात यावा.

१.६ पाणी वापर संस्थांना प्रचलित नियमानुसार देय असलेले देखभाल दुरुस्तीचे अनुदानाकरिताची १००% रक्कम राखून सिंचन पाणीपट्टीतून नियमित देखभाल दुरुस्तीची व परिरक्षणची कामे करतांना खालीलप्रमाणे उपांगनिहाय सर्वसाधारण विगतवारी असावी.

| | | |
|---|---|---|
| १ | धरण दुरुस्ती कामे | ४० % |
| २ | मुख्य कालवा, शाखा कालवा व वितरण व्यवस्था दुरुस्ती कामे | ५०% |
| ३ | कार्यालयीन इमारत परिरक्षण व दुरुस्ती | ०५% |
| ४ | निवासस्थाने व वसाहत परिरक्षण व दुरुस्ती | ०५% |
| | **एकूण** | **१००%** |

१.७ बिगर सिंचन पाणीपट्टीच्या ४० टक्के रक्कम व राज्यस्तरीय सिंचन कोषात ६० टक्के रक्कमेपैकी निकषानुसार महामंडळाच्या हिश्यातील रक्कम यामधून उपकर व आस्थापना परतावा वजा करण्यात यावा व उर्वरित पाणीपट्टीची रक्कम ही प्रकल्पांच्या सिंचन व्यवस्थापनाच्या कामांसाठी खर्च करण्यास अनुज्ञेय रक्कम राहील.

**उपरोक्त अनुज्ञेय रकमेमधून खालील प्रमाणे प्राधान्यानुसार कामे हाती घेण्यात यावी.**

(१) स्थापन झालेल्या पाणी वापर संस्थांना कार्यक्षेत्र हस्तांतरणाची पुर्नस्थापनेची कामे.

(2) सिंचन प्रकल्पावर अपुऱ्या सिंचन पाणीपट्टी अभावी घ्यावयाची अनिवार्य नियमित देखभाल दुरुस्ती कामे. उदा. को. प. बंधाऱ्यांचे गेट टाकणे / काढणे, शिर्षविमोचक द्वार दुरुस्ती इ.

(३) नियमित देखभाल दुरुस्तीत न होणारी धरण सुरक्षा संघटनेने प्रस्तावित केलेली Health Status Report मधील यांत्रिकी व स्थापत्य कामे.

(४) धरण व कालव्याची विशेष दुरुस्ती / नुतनीकरणाची कामे / यांत्रिकी विभागाच्या पाखरण कार्यक्रमानुसार करावयाची कामे

(५) निवासी / अनिवासी परिक्षण व इमारती दुरुस्ती कामे.बिनतारी संदेश यंत्रणा, सरिता मापन केंद्र, देखभाल व दुरुस्ती

(६) धरण कालवा सुरक्षा, सिंचन क्षेत्र मोजणी व व्यवस्थापन इ. करण्यासाठी लागणारे मनुष्यबळ बाहय अभिकरणा मार्फत (Out Sourcing) करावयाची कामे.

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
# नियामक मंडळाची ९४ वी बैठक दिनांक १७ मार्च २०१७

(७) नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणेसाठी करावयाची कामे.( Drone Survey, GPS, Mobile App, MIS इ)

**१.८** उपरोक्त प्राधान्यक्रमानुसार कामांची यादी मुख्य अभियंता यांचेमार्फत त्या वर्षी १५ एप्रिल पर्यंत महामंडळ कार्यालयास सादर करण्यात यावी. महामंडळ स्तरावर या यादींची छाननी करुन कार्यकारी समितीमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा. कार्यकारी समितीने शिफारस केलेल्या प्राधान्यक्रमानुसार नियामक मंडळाच्या बैठकीत कामाच्या यादीसह सिंचन व्यवस्थापनाचे कार्यक्रम अंदाजपत्रक व ताळेबंद यांस ३० एप्रिल पर्यंत मान्यता घेण्यात यावी व १५ ऑक्टोबरचा पाणी साठा विचारात घेऊन अंतिम करण्यांत यावा.

**१.९** स्थानिक स्वराज्य संस्थांना देय असलेल्या उपकराच्या अनुदान रकमा १ मार्च पूर्वी नियंत्रक अधिकाऱ्यांकडे संबंधित स्थानिक प्राधिकरणास अदायगीसाठी वर्ग कराव्यात. स्थानिक स्वराज्य संस्थांनी चालू / थकबाकीच्या पाणीपट्टी न भरल्यास या उपकर अनुदानाच्या रक्कमा महामंडळास येणे रकमाच्या हिशेबात प्राधान्यक्रमे समायोजित करण्यात याव्यात.

**१.१०** उपरोक्त कार्यपध्दती प्रमाणे हाती घेण्यात आलेल्या कामांचे व त्यावरील खर्चाचा विनियोग करण्यासाठी अधीक्षक अभियंता हे नियंत्रक अधिकारी असतील.

## २.०० पाणीवापर संस्थाचे परतावे देणेबाबतची कार्यपध्दती :

परिच्छेद १.७ प्रमाणे यांस प्राधान्य देण्यांत यावे. पाणी वापर संस्थांना प्रचलित नियमानुसार त्यांचे कार्यक्षेत्रांतर्गत जमा केलेल्या पाणीपट्टीच्या रकमांतून परिरक्षण व दुरुस्ती करिता द्यावयाच्या अनुदानाच्या रकमा पाणीवापर संस्थेने पाणीपट्टी जमा केल्यापासून १५ दिवसांच्या आंत सिंचन पाणीपट्टीतून अदा करण्यांत याव्यात.

## ३.०० प्रकल्पांच्या देखभाल दुरुस्तीच्या कामांना व सिंचन पुनर्स्थापनेच्या कामांना महामंडळ स्तरावरुन मान्यता देणेची कार्यपध्दती :

प्रकल्पातील सिंचनाचे पाणी बिगर सिंचनाकडे वळविल्याने बाधीत सिंचन क्षमता पुनर्स्थापना करणे करीता उपलब्ध होणारा निधी त्याच प्रकल्पावर सिंचन पुनर्स्थापनेसाठी खर्च करण्याचे बंधन आहे. यासाठी संबंधित प्रकल्प पुनर्स्थापनेकरीता आवश्यक आराखडा तयार करुन मुख्य अभियंता यांची सर्वसाधारण मान्यता घ्यावी.

या कामांचा समावेश सिंचन व्यवस्थापनाचे कार्यक्रम अंदाजपत्रकात करण्यात यावा. त्यास महामंडळाच्या नियामक मंडळाची मान्यता घेण्यात यावी.

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ९४ वी बैठक दिनांक १७ मार्च २०१७

सिंचन पाणीपट्टीतून जमा होणाऱ्या निधीतून प्रकल्पाच्या नियमित देखभाल दुरुस्तींच्या कामाच्या मंजुर अंदाजपत्रकानुसार अधीक्षक अभियंता यांचेद्वारे प्राप्त निधी मागणीचे तिमाही संवितरण प्रकल्पनिहाय जमा रकमेच्या मर्यादेत कार्यकारी संचालक यांचे मान्यतेने करण्यात यावे.

**४.०० सिंचन व्यवस्थापन आस्थापना खर्च मर्यादित राहण्यासाठी उपाययोजना राबविणे :**

शासन स्तरावर सिंचन व्यवस्थापनाकरीता आवश्यक आस्थापना व आकृतीबंध तयार करण्याची कार्यवाही चालू आहे, सदरची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर, मंजूर आस्थापना विवरणानुसार कार्यवाही करणे महामंडळावर बंधनकारक राहील.

**५.०० शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/ (४४/२०१५)/ सिं.व्य (धोरण) दि.१७-११-२०१६ नुसार पूर्ण झालेल्या प्रगती पथावरील व नियोजित सिंचन प्रकल्पातून विहित केलेल्या क्षेत्रीय वाटपाच्या मर्यादेमध्ये पिण्याच्या पाण्याच्या व औद्योगिक पाणी वापराच्या आरक्षण प्रस्तावास महामंडळ स्तरावरुन मान्यता देण्याच्या सूचना आहेत. त्या अनुषंगाने वापरावयाची कार्य पध्दती :**

बिगर सिंचन पाणी आरक्षणास मंजुरीचे अधिकार पूर्वी मुख्य अभियंता यांना होते. तदनंतर महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण कायदा २००५ नुसार मंत्रीमंडळ समितीला होते. शासनाचे दि. १७-११-२०१६ च्या शासन निर्णयानुसार (अ) पिण्यासाठी १५ % (ब) औद्योगिक १०% या मर्यादेमधील बिगर सिंचन पाणी आखणी प्रस्तावास महामंडळ स्तरावरुन मान्यता द्यावी असे निदेश आहेत.

या अनुषंगाने महामंडळ स्तरावरुन बिगर सिंचन पाणी आरक्षण प्रस्तावास शासनाने घातलेल्या वापरकर्तानिहाय पाणीकोट्याच्या (Sectoral Allocation) विहीत मर्यादेत मान्यता देण्याचे अंतिम अधिकार कार्यकारी संचालकाच्या शिफारशीनुसार मा. मंत्री, जलसंपदा तथा अध्यक्ष, मकृखोविम. यांना राहतील.